**इतिवृत्त :-**

## जिल्हा उदयोग मित्र समिती सभा

**जिल्हा उद्योग मित्र समिती सभा दि. १८/११/२०१० रोजी स. ९.३० वा. मा. श्री. आर. के. गायकवाड, जिल्हाधिकारी, पुणे यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. सभेस उपस्थित सदस्य, निमंत्रित सदस्य व औद्योगिक संघटनांची यादी सोबतच्या प्रपत्र अ सोबत जोडली आहं. सदरच्या सभेचे इतिवृत्त खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | औदयोगिक संघटना/उदयोजक | सभेतील चर्चेचा सारांश | निर्णय/ कार्यवाही | कार्यवाहीशी संबंधित विभाग/कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | दि. १५/०२/२०१० रोजी झालेल्या सभेचा इतिवत्तांत मंजूरी देणे | सर्व उपस्थितांचे स्वागत महाव्यवस्थापक, जि. उ. कें, पुणे तथा सदस्य सचिव यांनी केले. तसेच दि.१५/२/२०१० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त या कार्यालयाचे पत्र क्र. ३२४, दि. १७/२/२०१० रोजी सर्व सभासदांना पाठविण्यात आलेचे सांगितले. त्यामध्ये कोणत्याही सदस्यांचा आक्षेप नसल्याने इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले. | -- | महाव्यवस्थापक, जिउकें, पुणे |
| | **मागील बैठकीतील कार्यवाहीचे विषय** | | | |
| २ | ***विषय क्र.२/१:-*** **पिपंरी-चिंचवड लघु उद्योजक विकास समिती, पुणे.** उद्योग घटकांना एम.आय. डि.सी. क्षेत्रामध्ये भूखंडावर भू-गर्भातील पाणी काढणे साठी बोअर करण्याची परवानगी. | एम.आय.डि.सी. च्या विविध औद्योगिक क्षेत्रात स्थापित होणा-या उद्योगांना औद्योगिक वापरासाठी लागणा-या पाण्याचा पुरवठा करणे ही एम.आय.डि.सी.ची प्राथमिक जबाबदारी असून, महामंडळाकडून सर्व घटकांना पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करण्यात येतो. एम.आय. डि.सी. च्या धोरणानुसार उद्योजकांना बोअर वेल करीता परवानगी देता येत नाही. याबाबत औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधींने सांगीतले की, मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केल्यानंतरही पाणी मिळत नसल्याने बोअर घेण्याची परवानगी मिळावी, जेणे करुन उद्योग घटक विहित कालावधीत सुरु होवू शकेल. विशिष्ट उद्योग घटकांच्या बाबतीत पाण्याची अडचण असल्यास त्याबाबत तात्पुरता पाणी पुरवठा करण्यास महामंडळास निर्देशित करता येईल. मा. अध्यक्षांनी सांगीतले. | महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात पाणी पुरवठा सेवा उपलब्ध करणे ही महामंडळाची जबाबदारी असून औद्योगिक क्षेत्रात बोअरवेलसाठी परवानगी न देण्याचे महामंडळाचे धोरण आहे. सबब, सदर विषय रद्द करण्यास समितीने मान्यता दिली. | जिउकें, पुणे |
| ३ | ***विषय क्र.२/२:-*** **पिपंरी-चिंचवड लघु उद्योजक विकास समिती, पुणे.** पीसीएमसी मधील निवासी [illegible] | निवासी विभागातील लघु उद्योजकांचे पुर्नवसन पात्र अर्ज ठरविण्याची प्रक्रिया पिं.चिं. मनपा सतरावर चालु आहे. सदरच्या प्लॉटवर महानगर पालिके कडून बांधकाम सुरु करण्यात आले | निवासी विभागातील लघु उद्योजकांचे पुर्नवसन एम. आय. डि.सी. मध्ये व्हावे व त्यांसाठीच्या भू:खंडासाठी | पि.सी.एम.सी. व जिउकें, पुणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | विभागातील लघु उद्योजकां चे पुर्नवसन एम.आय.डि. सी. मध्ये करण्यासाठी एम. आय.डि.सी. ने पुढाकार घेणे. | आहे. १८३ घटकांची यादी माहितीसाठी पाठविलेली आहे. ती सदरची यादी जुनी असल्यामुळे फेर सर्वेक्षण करुन यादी अंतीम करण्यात यावी. औद्योगिक क्षेत्रात जागा नसल्यामुळे निवासी विभागामध्ये उद्योग आहेत. त्यांचे पुर्नवर्सन व्हावे व पुर्नवसन करण्यासाठी च्या भू:खंडाचा रु. २.०० कोटीचा दंड माफ करण्यात यावा असे औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधींने सुचविले. त्यावर, मुख्य कार्यकारी अधिकारी, पि.सी.एम.सी. मार्फत औद्योगिक संघटनेने प्रयत्न करावा व जिल्हा उद्योग केंद्राने याबाबत शिफारस करावी, असे मा. जिल्हाधिकारी, पुणे यांनी आदेश दिले. | एमआयडीसीने केलेला रु. २.०० कोटीचा दंड माफ करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना पि.सी.एम.सी. मार्फत औद्योगिक संघटनेने प्रयत्न करुन जिल्हा उद्योग केंद्राने शिफारस करावी, असे निर्देशित केले. | |
| ४ | ***विषय क्र.२/३:-*** **पिपंरी-चिंचवड लघु उद्योजक विकास समिती,पुणे.** एम.आय.डि.सी.च्या ट्रान्सफर गाईड लाईन्स आणखी सुलभ करुन औद्योगिक धोरण उद्योजका -भिमूक करणे. | एम.आय.डि.सी. च्या भूखंड हस्तांतरण महामंडळाच्या नवीन धोरणानुसार कार्यवाही करण्यात येत असून सदर धोरणाचे राज्यातील सर्व औद्योगिक संघटनांनी स्वागत केलेले आहे. नवीन भूखंड हस्तांतरण धोरण कार्यरत झाल्याने सदर विषय वगळण्यात मा. अध्यक्षांनी मान्यता दिली. | विषय रद्द करण्यास मान्यता. | एम.आय.डि. सी, पुणे |
| ५ | ***विषय क्र.२/४:-*** **पिपंरी-चिंचवड लघु उद्योजक विकास समिती, पुणे.** पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणकडून उभ्या केलेल्या औद्योगिक वसाहती मध्ये मूलभूत सेवा सुविधा त्वरित उपलब्ध करुन देण्याबाबत. | औद्योगिक संघटनांनी प्राधिकरण क्षेत्रात स्थापित होणा-या उद्योग घटकांची एकत्रित माहिती उपलब्ध करुन त्यांना आवश्यक त्या मुलभूत सेवा देण्याबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आयुक्त, पि.सी.एम.सी., विभागीय अधिकारी, एम.आय.डि.सी. व औद्योगिक संघटना यांची विशेष बैठक आयोजित करुन औद्योगिक वसाहती मध्ये मूलभूत सेवा सुविधा त्वरित उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने चर्चा करावी, असे मा. अध्यक्ष यांनी सुचविले. | मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आयुक्त, पि.सी.एम.सी., एम.आय.डि.सी. व औद्योगिक संघटनांची विशेष बैठक आयोजित करणे. | पिंपरी - चिंचवड मनपा, एम.आय. डि.सी.,पुणे औद्योगिक संघटना. |
| ६ | ***विषय क्र. २/५:-*** पिंपरी - चिंचवड लधु उद्योजक विकास समिती, पुणे यांचा प्रश्न मोठ्या उद्योगांकडून लहान उद्योगांकडील थकीत बिला बाबतचे मे. वसंत इंडस्ट्रीजचे पत्राबाबत ची कार्यवाही. | पुणे विभागाकरीता सुक्ष्म व लघु उपक्रम सुकरता परिषद स्थापन केलेली असून सदर बाबत उद्योग सह संचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडून कार्यवाही सुरु असल्याचे महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे यांनी सभागृहास दिली.<br><br>शासनाने पुणे विभागाकरीता सुक्ष्म व लघु उपक्रम सुकरता परिषद स्थापन केलेल्या | पुणे विभागाकरीता सुक्ष्म व लघु उपक्रम सुकरता परिषद स्थापन झाल्याने सुकरता परिषदेकडे अशी प्रकरणे सादर करण्या-बाबत आवाहन करण्यात आले. | जिउकें, पुणे व सर्व औद्योगिक संघटना |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | परिषदेकडे अशा प्रकारची प्रकरणे सादर केल्यास त्यावर त्वरीत निर्णय घेता येईल. असे मा. अध्यक्षांनी सुचविले. | | |
| ७ | ***विषय क्र. २/६:-***<br>संरक्षण खात्याचे जमीनीवर उदा. तळवडे जागेवरील संरक्षण खात्याचे आरक्षण उठविण्याची संबंधित खात्याकडे शिफारस करणे. | तळवडे निवासी भागात बांधकामास संरक्षण / कन्टोमेंट, देहूरोड खाते परवानगी देत नाही. तसेच संबंधीत अधिकारी सभेस उपस्थित राहात नसल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली. याबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, देहूरोड कॅन्टोंमेंट यांना पत्राने कळविण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या. | मुख्य कार्यकारी अधिकारी, देहूरोड कॅन्टोंमेंट व मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना बैठकीस उपस्थित राहण्या बाबत पत्राने कळविणे. | सरंक्षण विभागचे अधिकारी, कॅन्टोंमेंट बोर्ड, देहूरोड व जिउकें, पुणे |
| ८. | ***विषय क्र. २/७:-***<br>बीएसएनएल व पि.सी. एम.सी. च्या समन्वया अभावी उद्योजकांचे हजारो टेलिफोन्स कित्येक महिने बंद आहेत. त्याबाबतच्या उपाय योजनांबाबत. | बैठकीस बी.एस.एन.एल. चे अधिकारी / प्रतिनिधी हजर नसल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, पुणे यांचे सहीने पुन्हा पत्र पाठवावे व संबंधित विषय वरिष्ठांच्या निदर्शनास आणून तसेच इंतिवृत्ताची प्रत पाठविण्यात येवून बैठकी बाबतची पूर्व कल्पना देण्यात यावी असे मा. अध्यक्षांनी निर्देशित केले. | मा. जिल्हाधिकारी, पुणे यांच्या स्वाक्षरीने पत्र पाठवून विषय वरिष्ठ अधिकारी यांच्या निदर्शनास आणून बैठकीची कल्पना देण्यात यावी. | बी.एस.एन.एल. व जिउकें, पुणे |
| ९ | ***विषय क्र. २/९:-***<br>शॉप ॲक्ट लायसेंस फी स्टेट बँके इंडियाच्या प्रत्येक शाखेत स्विकारण्या बाबत. | पिंपरी-चिंचवडच्या मोठ्या औद्योगिक क्षेत्रामध्ये शॉप ॲक्ट लायसेन्स शुल्क स्विकारणेसाठी स्टेट बँक ऑफ इंडियांच्या नाशिकफाटा शाखा येथे फक्त एकाच शाखेत शॉप ॲक्ट लायसेन्स शुल्क स्विकारणे चालू आहे. अशा ३-४ शाखा औद्यागिक क्षेत्रात असणे आवश्यक आहे. ह्या विषयी डि.एल.सी.सी. च्या बैठकी मध्ये चर्चा करण्यात येवून आदेशही देण्यात आले असून, स्टेट बँकेच्या शाखेत शॉप ॲक्ट लायसेन्स शुल्क स्विकारणे बाबत अद्याप मंजूरी मिळालेली नाही. असे औद्योगिक संघटनेने निदर्शनास आणून दिले. स्टेट बँकेच्या वरिष्ठ अधिका-याबरोबर डि.एल.सी.सी. च्या बैठकी मध्ये देण्यात आलेल्या आदेशान्वये प्राधान्याने मंजूरी मिळण्यासाठी पाठपुरावा करण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या. | औद्योगिक क्षेत्रामध्ये शॉप ॲक्ट लायसेन्स शुल्क स्विकारणे साठी स्टेट बँकेच्या वरिष्ठांबरोबर डि. एल.सी.सी. च्या बैठकी मध्ये देण्यात आलेल्या आदेशान्वये मंजूरी मिळण्यासाठी पाठपुरावा करावा. | जिल्हा अग्रणी व्यवस्थापक व जिउकें, पुणे |
| १० | ***विषय क्र. २/१०:-***<br>उद्योगांशी निगडीत शासनाची कार्यालये पिंपरी - चिंचवड या उभरत्या औद्योगिक नगरीत उपलब्ध होणेबाबत. **उदा. पी.एफ. ऑफिस, ई.एस.आय. मुख्य** | पिंपरी - चिंचवड म.न.पा. कार्यालयात इतर संबंधीत कार्यालयांना टेबलस्पेस जागा उपलब्ध करुन त्या-त्या खात्याचा एखादा अधिकारी / कर्मचारी नेमावा, मनपा, पुणे पेक्षा जास्त मोठ्या प्रमाणात मनपा, पिंपरी-चिंचवडला करातून उत्पन्न मिळत आहे. असे औद्योगिक संघटनेने सांगीतले. याबाबत सविस्तर माहिती तयार | संबंधित खात्याचा एखादा अधिकारी / कर्मचारी नेमूण पिंपरी-चिंचवड मनपास स्मरण - पत्र देवून अधिका-यांशी चर्चा करुन त्वरीत निर्णय घेता येईल. | पि.सि.एम.सी., जि.उ.कें., पुणे व औद्योगिक संघटना. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **ऑफिस, सेल्स टॅक्स, लेबर व उद्योग खात्याची उप - कार्यालये.** | करुन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अधिका-यांना स्मरण-पत्र देण्यात यावे. त्यानंतर, मी स्वत: संबंधित खात्याच्या अधिका-यांशी चर्चा करुन लवकरच याचा निर्णय लावण्यात येईल, असे मा. अध्यक्षांनी सांगीतले. | | |
| ११ | **बारामती चेंबर ऑफ कॉमर्स अँड इडस्ट्रीज, पुणे.**<br>*विषय क्र.३/१:-*<br>१. बारामती एम.आय. डि.सी. औद्योगिक क्षेत्रात १९८८ च्या ग्रोथ सेंटर च्या शासन निर्णया नुसार सवलती मिळणे बाबत. | सदर मुद्यांबाबत उद्योग संचालनालय, मुंबई यांचेकडे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. तसेच नविन औद्योगिक धोरण-२००७ नुसार निर्देशित औद्योगिक क्षेत्रे, तंत्रज्ञान उद्याने व समुह विकास क्षेत्रामध्ये सध्याच्या औद्योगिक झोनच्या एक स्तर पुढील प्रोत्साहने देण्याबाबत शासनाने शासन निर्णय निर्गमित केल्याचे महाव्यवस्थापक, जिउके, पुणे यांनी सांगीतले. बारामती औद्योगिक क्षेत्रात ८०% भूखंडांमध्ये उद्योग सुरू झालेले नसून व बारामती तालुक्यात उद्योग वाढीस वाव असल्याने सध्या अस्तित्वात असलेल्या झोनच्या पुढील एक स्तर प्रोत्साहने मिळण्याबाबत औद्योगिक संघटनेने मागणी केली. याबाबत शासनाकडे सदरबाबतचा प्रस्ताव जिल्हा उद्योग मित्र समितीच्या शिफारशीने पाठविण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या. | बारामती औद्योगिक क्षेत्रात व तालुक्यात एकस्तर प्रोत्साहने देण्या बाबतचा प्रस्ताव जिल्हा उद्योग मित्र समितीच्या शिफारशीने पाठवावे, अश्या सूचना दिल्या. | जि. उ.कें., पुणे |
| १२ | *विषय क्र.३/२:-*<br>एम.आय.डि.सी. बारामती क्षेत्रा मध्ये होत असलेल्या अशुध्द पाणी पुरवठ्या-बाबत. | एम.आय.डि.सी. मार्फत पुरवठा करण्यात येणारे पाणी अशुध्द असते, परंतू सध्या एमआयडीसीने केलेल्या उपाय योजनेमुळे पाणी योग्य प्रतीचे उपलब्ध होत आहे. तसेच उन्हाळयामध्ये पाण्याचे प्रमाण कमी झाल्यानंतर अशुध्द पाणी पिण्यायोग्य होणार नाही, याबाबत एम.आय. डि.सी. ने योग्य त्या उपाय योजना कराव्यात असे औद्योगिक संघटनेने सांगीतले.<br><br>सदर बाबतीत सद्य:स्थितीत केलेल्या उपाय योजना उन्हाळयामध्येही सुरू राहतील व उद्योग घटकांना अशुध्द पाणी मिळणार नाही याची खबरदारी घेण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या. तसेच केलेल्या उपाय योजनांबाबत स्वत: एम.आय.डि.सी. बारामती प्रत्यक्ष भेट देणार असल्याचे सांगीतले. | पाणी पुरवठा शुध्दी-करणाच्या उपाय योजना उन्हाळयामध्ये देखील पूर्ववत: ठेवण्याची खबरदारी एमआयडीसीने घ्यावी. | कार्यकारी अभियंता, एम.आय.डि. सी. बारामती. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | ***विषय क्र.३/३:-***<br>एम.आय.डि.सी. च्या औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांकडून अग्नी सुरक्षा शुल्क आकारणे बाबत. | एम.आय.डि.सी. वसाहतीतील उद्योजकांच्या अग्नी सुरक्षे करीता उद्योजकांकडून आकारण्यात येणारे सुरक्षा शुल्क व तपासणी फी मोठ्या प्रमाणात असून प्रशासकिय व्यवस्था त्रासदायक आहे. उद्योग सुरु ठेवणे अडचणीचे आहे. एम.आय. डि.सी. च्या यादीनुसार धोकादायक नसलेल्या उद्योगांना देखील खर्चिक आग्रह योग्य नाही असे औद्योगिक संघटनांनी निदर्शनास आणले. याबाबत एम.आय.डि.सी.चे विभागीय अग्निशामक अधिकारी यांनी नमुद केले की, अग्नी सुरक्षा शुल्क व इतर उपाय योजना या फायर ॲक्टनुसार (नॅशनल बिल्डिंग कोडद्वारे) ठरविण्यात आलेल्या आहेत. फायर प्रोटेक्शन सिस्टिमव्दारे सुरक्षा उपाय कोण-कोणते देण्यात येतात याबाबतची वेब साईटवर संपूर्ण माहिती उपलब्ध आहे.<br><br>याबाबत हॅजार्डस उद्योग घटकांना सदर आवश्यक उपाय योजना लागू असणा-या घटकांना अग्नी सुरक्षा शुल्क आकारण्यात यावे, असे मा. अध्यक्ष यांनी सुचविले. | अग्नी सुरक्षा शुल्क व इतर उपाय योजना या फायर ॲक्ट नुसार (नॅशनल बिल्डिंग कोड द्वारे) ठरविण्यात आलेल्या आहेत. फायर प्रोटेक्शन सिस्टिमद्वारे सुरक्षा उपाय वेब साईटवर माहिती उपलब्ध आहे. हॅजार्डस उद्योग घटकांना आवश्यक उपाय योजना लागू असणा-या घटकांना अग्नी सुरक्षा शुल्क आकारण्यात यावा. सबब विषय रद्द करण्यास मान्यता. | विभागीय अधिकारी, एम.आय.डि.सी., पुणे. |
| १४ | ***विषय क्र.३/५:-***<br>**जिल्हा उद्योग केंद्र, पुणे येथे उद्योग सेतू कार्यान्वित करणे.** | शासन निर्णयान्वये जिल्हा उद्योग केंद्र, पुणे येथे उद्योजकांच्या सोयीसाठी उद्योग सेतू कार्यान्वित केल्याबाबतची माहिती महाव्यवस्थापक यांनी बैठकीत दिली. उद्योग सेतूच्या अनुषंगिक सोयी, सुविधांसाठी जिल्ह्यातील औद्योगिक संघटनां-कडून आर्थिक सहभागाने सुरु केलेला आहे. उद्योग सेतूद्वारे जिल्हा उद्योग केंद्राच्या व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या सेवा सुरु केलेल्या असून शा. नि. नुसार इतर विभागांच्या जसे कामगार विभाग, एम.आय.डि.सी., एम.एस.ई.बी. यांच्या सेवा देण्याचे नियोजित आहेत. याबाबत कामगार विभाग, एम.आय. डि.सी., बाष्पके, एम.एस.ई.बी. यांच्या सेवा देण्यासाठी सहकार्य करण्याबाबत महाव्यवस्थापक यांनी विनंती केली.<br><br>याबाबत कार्यध्यक्ष, पिंपरी-चिंचवड लघु उद्योजक विकास समिती, पुणे यांनी पुणे जिल्ह्यात औद्योगिक परिसरातील उद्योजकांच्या सोयीसाठी उद्योग सेतू सक्षमरित्या सुरु करण्यात आले असल्याचे सांगितले. | शा. नि. नुसार कामगार विभाग, एम.आय.डि.सी., एम.एस.ई.बी. यांच्या सेवा उद्योग सेतूमध्ये सुरु करण्यासाठी संबंधीतांची बैठक घेऊन समन्वय करण्याचे निर्देशित केले. | कामगार आयुक्त, एम.आय.डि.सी., एम.एस.ई.बी व जि. उ. कें. , पुणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | परन्तु, मा. विभागीय अधिकारी, एम.आय.डि.सी., पुणे यांनी इतर कार्यालये वेग-वेगळया ठिकाणी असल्यामुळे कामाचा उरक होण्यास विलंब होणार असल्यामुळे अडचणी निर्माण होतील, सेवा कितपत उपयुक्त आहे किवा नाही? याची योग्यती तपासणी करण्यात यावी, असे सांगीतले. याबाबत मा. अध्यक्षांनी सदर सेवा सुरु करण्यासाठी बैठक घेऊन योग्य तो समन्वय करावा असे निर्देशित केले. | | |
| १५ | **नवीन विषय :-** | | | |
| | **१. <u>उद्योग मित्र</u> :- जिल्ह्यातील उद्योजकांना / औद्योगिक संघटनांना याबाबत माहिती देवून जिल्ह्याच्या विकासात उद्योगपतींना योगदान देण्याबाबत आवाहन.** | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे यांनी श्री. व्यं. ह. कुलकर्णी, अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय मुंबई यांचे प्राप्त झालेल्या दि. १७-०८-२०१० च्या पत्रातील जिल्ह्याच्या विकासात जिल्ह्यातील नामांकित उद्योगांच्या सहभागाने विकास करणेबाबतची माहिती सभागृहात विषद केली. | जिल्ह्याच्या विकासात जिल्ह्यातील नामांकित उद्योगांच्या सहभागाने विकास करणे बाबतची माहिती सभागृहात देण्यात आली. | -- |
| | **२. सुक्ष्म, लघु उपक्रम - सुकरता परिषद** | सुक्ष्म, लघु उद्योगांनी विकलेल्या वस्तुचे मुल्य / किंमत मोठया उद्योग घटकांकडून विहित कालावधीत मिळण्यास विलंब झाल्यास त्याबाबत समन्वय व वसुलीसाठी पुणे विभागासाठी मा. विभागीय आयुक्त, पुणे यांचे अध्यक्षतेखाली सुकरता परिषद स्थापित केलेली आहे. त्यासाठी जिल्ह्यातील अश्या घटकांनी प्रस्ताव कार्यालयास सादर करण्याबाबत महाव्यवस्थापक यांनी सर्व औद्योगिक संघटनांना आवाहन केले. | -- | सर्व औद्योगिक संघटना |
| | **३. पिंपरी-चिंचवड लघु उद्योजक विकास समिती यांचे मुद्देः-** | | | |
| | **अ.**चाकण एम.आय.डि.सी. मधील मे. गास्क पॉलिमर प्रा.लि., यांना मुलभूत सुविधा मिळत नसल्या बाबत. | **अ.** चाकण एम.आय.डि.सी. मधील मे. गास्क पॉलिमर प्रा. लि., यांना मुलभूत सुविधा मिळत नसल्या बद्दलचा त्यांनी एम.आयडि.सी. कडे केलेल्या अर्जाबाबत विचार करुन त्यांना सेवा सुविधा उपलब्ध करुन देणे अन्यथा त्यांना होणारे नुकसानी बाबत संबंधीत खात्याकडून भरपाई मिळण्याबाबत. | एमआयडीसी यांनी सदर बाबत जिल्हा उद्योग केंद्राकडे माहिती सादर करण्याचे मा. अध्यक्षांनी निर्देशित केले. | एम.आय.डी.सी., पुणे |
| | **ब.**महावितरण कडून बिला बाबत होणारा विलंब चुकीच्या बिला मुळे होणारे दुष्परिणाम आऊटसोर्सिंग | महावितरणाकडून खाजगी कंत्राटदारांव्दारे चुकीचे वीज बील दिले जातात. दोन-तीन महिने उशिरा बीले दिले जातात असे औद्योगिक संघटनेने सांगीतले. सध्या बीला बाबतची रिडिंग | खाजगी कंत्राटदाराद्वारे देण्यात आलेले बीलांच डाटा घेवून, महा वितरण यंत्रणेची बैठक घेऊन | महावितरण, पुणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ऍजन्सीची निष्क्रीयता व त्यावर उपाय योजना. | इलेक्ट्रॉनिक फोटो मशीनव्दारे घेतले जातात, रिडिंग हे दिवसाचे, संध्याकाळचे व रात्रीचे दर वेग-वेगळे असल्याने चुकीचे आहेत असे औद्योगिक संघटनांनी सांगितले.<br><br>यावर, मा. अध्यक्षांनी असे सांगीतले की, खाजगी कंत्राटदारांव्दारे देण्यात आलेले बीलांचा डाटा घेवून, महावितरणच्या यंत्रणेची मिटिंग घ्यावी व त्यांच्याकडून अशा प्रकारच्या चुका किंवा चुकीचे बीले दिले जावू  नये याबाबतचे प्रशिक्षण देण्याबाबत योजना आखावी, त्यामुळे महावितरणाच्या बीलामध्ये सुधारणा घडून येईल. | चुकीचे बीले दिले जावू नये या बाबतीत महावितरण ने दक्षता घ्यावी. | |
| | **क.** एम.आय.डि.सी. एरिया मध्ये स्वतंत्र फायर स्टेशन उपलब्ध करुन मिळणेबाबत. | एम.आय.डि.सी. क्षेत्रात एकही फायर स्टेशन नाही. आगीच्या घटना घडल्यानंतर जवळ-पास फायर स्टेशन नसल्यामुळे येण्यास बराच वेळ लागतो. अत्यंत महत्वाच्या सुरक्षा व्यवस्थे करीता एम.आय.डि.सी. च्या नजिकच्या क्षेत्रात फायर स्टेशन उपलब्ध करुन देण्यात यावे, असे औद्योगिक संघटनेने प्रश्न उपस्थित केला.<br><br>याबाबत, एम.आय.डि.सी. च्या अधिका-यांनी असे सांगीतले की, पि.सि.एम.सी. च्या बरोबर याबाबत चर्चा सुरु आहे. त्यामुळे, लवकरच फायर स्टेशन उपलब्ध होवू शकेल.<br><br>या संदर्भात मा. अध्यक्षांनी टेलिफोन, फायर स्टेशन, पोलिस स्टेशन यासारख्या आवश्यक सुविधा विषयाच्या प्रश्नासाठी तातडीने विशेष बैठक घेण्यासाठी यंत्रणेला कळविण्यात येवून त्वरीत कार्यवाही करुन, विषय मार्गी लावून पुढील सभेत या बाबतची माहिती देण्याबाबत आदेश दिला. | एम. आय. डी. सी. व पि. सि. एम. सी. यांनी फायर स्टेशन सुविधा उपलब्ध करण्यासाठी तातडीने बैठक आयोजित करावी. | पीसीएमसी व एमआयडीसी |
| | **इ.** एम.आय.डि.सी. F-II ब्लॉकमध्ये नाल्याचे बांधकामाबाबत. | मा. अध्यक्षांनी आवश्यक सुविधा विषयाच्या प्रश्नासाठी तातडीने वरील प्रमाणे विशेष बैठक घेण्यासाठी यंत्रणेला कळविण्यात येवून त्वरीत कार्यवाहीसह निर्णय घेवून पुढील सभेत या बाबतचा अहवाल सादर करण्याबाबत आदेश दिला. | विशेष बैठक ओयाजित करुन यंत्रणेला कळवि-ण्यात येवून त्वरीत कार्यवाही करुन या बाबतचा अहवाल सादर करण्यात यावा. | एम.आय.डि.सी., बारामती |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **४. बारामती चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर, बारामती, यांनी उपस्थित केलेले मुद्दे :-** | | | |
| | **अ.एम.आय.डि.सी. क्षेत्रात उद्योग घटकांकडुन ग्राम पंचायत कर आकारण्यात येवू नये.** | एम.आय.डि.सी. क्षेत्रातील उद्योग घटकांना संबंधीत ग्रा.पं.कडून कोणत्याही सुविधा उपलब्ध होत नसतांना, ग्रामपंचायत कर लावत आहेत. उद्योग घटकांनी कर दिला नाहीतर, जप्ती आणले जाते आहे, असे औद्योगिक संघटनेने नमुद केले.<br>सदर बाबतचा प्रश्न सोडविण्यासाठी एम.आय.डि.सी. व ग्रामपंचायत यांची बैठक घेवून समन्वयातून प्रश्न सोडवावा अन्यथा मा. उप-मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, आयोजीत करुन प्रश्न निकाली काढण्यासाठी औद्योगिक संघटनेने आग्रह धरावा. अशा मा. अध्यक्ष यांनी सुचना केल्या. | एम.आय.डि.सी., बारामती व ग्राम पंचायत समिती, बारामती यांची संयुक्त बैठक घेवून चर्चेतून प्रश्न सोडवावा अन्यथा मा. उप-मुख्यमंत्री समवेत विशेष बैठक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औद्योगिक संघटना बैठक आयोजित करणे. | एम.आय.डि.सी., बारामती व ग्रामपंचायत समिती, बारामती |
| | **ब. उद्योग घटकांसाठी एम.आय.डि.सी. ने निवासी भूखंड उपलब्ध करुन देणे.** | बारामती एमआयडीसीमध्ये नविन निवासी झोन निर्माण करुन, लिलाव पध्दत बंद करून केवळ पात्र उद्योजकांना निवासी भूखंड उपलब्ध करुन द्यावेत.<br>याबाबत विभागीय अधिकारी, एमआयडीसी यांनी योग्य ती कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | निवासी भूखंडाबाबत कार्यवाही करुन समितीस अहवाल सादर करणे. | एम.आय.डि.सी., पुणे |
| | **क. बारामती भागातील उद्योग घटकांसाठी बारामती एम.आय.डि.सी. मध्ये पिंपरी - चिंचवड मधील औद्योगिक सहकारी संस्थांच्या धर्तीवर भूखंड / गाळे उपलब्ध करुन देणेबाबत.** | याबाबत महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे यांनी पिंपरी-चिंचवड मधील औद्योगिक सहकारी संस्थांच्या धर्तीवर भूखंड / गाळे उपलब्ध करुन देण्याबाबत समितीमार्फत शिफारस करता येईल, असे सभागृहास सांगीतले. याबाबत आद्यौगिक संघटनेने विस्तृत प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचना दिल्या. | औद्योगिक संघटनेने सदर बाबतचा प्रस्ताव समितीस सादर करावा. | जि. उ.कें., पुणे |
| | **ड. बारामती क्षेत्रासाठी एम.आय.डि.सी. चे विभागीय कार्यालय सुरु करण्याबाबत.** | बारामती, पणदरे, भिगवण, कुरकुंभ, जेजुरी, इंदापूर, फलटण, करमाळा, टेंभूर्णी इ. औद्योगिक क्षेत्रासाठी स्वतंत्र विभागीय कार्यालय सुरु करण्याची मागणी केली. सद्यःस्थितीमध्ये आठवड्यातील २ - ३ दिवस एखादा अधिकारी / कर्मचारी बारामती येथे उपलब्ध करावेत. याबाबत समितीमार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी, एमआयडीसी यांचेकडे स्वतंत्र विभागीय कार्यालय सुरु करणेबाबत शिफारस करण्याच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या. | एम. आय. डि. सी. चे विभागीय कार्यालय सुरु करण्याबाबत जिल्हा उद्योग मित्र समिती मार्फत शिफारस करण्यात यावी. | जि. उ.कें., पुणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **इ. महावितरणाचे स्ट्रीट लाईन बरेच दिवस बंद अवस्थेत आहेत.** | महावितरणाचे स्ट्रीट लाईन बरेच दिवस बंद अवस्थेत आहेत. त्याच प्रमाणे ब-याच वेळा पूर्व सुचना न देतासुध्दा वीज खंडित केली जाते. असे औद्योगिक संघटनेने सांगीतले.<br>महावितरणाच्या प्रतिनिधीने असे सांगीतले की, स्ट्रीट लाईनच्या संदर्भात नवीन दुरुस्तीचे काम सुरु असून याबाबत टेंडर मागवून काम सुरु आहे. मा. अध्यक्षांनी याबाबत महावितरणच्या संबंधित अधिका-यांना लेखी पत्राद्वारे कळविण्यात यावे, असा आदेश दिला. | महावितरणाच्या संबंधित अधिका-यांना लेखी पत्रा-द्वारे कळवावे. | महावितरण |
| | **ई. एम.आय.डि.सी. बारामती मध्ये पोलिस स्टेशन मंजूर करणे.** | औद्योगिक क्षेत्रामधील वाढ व औद्योगिक क्षेत्र विविध पोलिस चौकीच्या अंतर्गत असल्याने व चो-या मोठया प्रमाणात वाढल्याने, बारामती औद्योगिक क्षेत्रासाठी स्वतंत्र पोलिस स्टेशन मंजूर करण्याची विनंती केली.<br>यावर, मा. अध्यक्ष यांनी उपरोक्तबाबत समितीमार्फत शिफारस करण्यात यावी, असा आदेश दिला. | सदर बाबत जिल्हा उद्योग मित्र समिती मार्फत शिफारस करण्यात यावी. | जि. उ.कें., पुणे |
| | **उ. जिल्हा उद्योग मित्र समितीची सभा प्रत्येक महिन्याला घेण्यात यावी.** | याबाबत मा. अध्यक्षांनी असे सांगीतले की, लोकशाही दिन ज्या दिवशी सुरु असते, त्याच दिवशी जिल्हा उद्योग मित्र समितीचीही प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हा उद्योग मित्र समितीची सभा बोलाविण्यात यावी, अशा सूचना दिल्या. | जिल्हा उद्योग मित्र समितीची सभा प्रत्येक महिन्यात नियमित घेणे. | जि. उ.कें., पुणे |

मा. अध्यक्षांचे परवानगीने सर्व उपस्थितांचे आभार मानुन, बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**सही/xxx**
( एस. एस. सुरवसे )
महाव्यवस्थापक, जि.उ.कें., पुणे
तथा सदस्य सचिव,
जिल्हा उद्योग मित्र समिती, पुणे

**सही/xxx**
( आर. के. गायकवाड )
जिल्हाधिकारी पुणे
तथा, अध्यक्ष,
जिल्हा उद्योग मित्र समिती, पुणे.

# जिल्हा उद्योग मित्र समिती सभा

**जिल्हा उद्योग समितीची मा. श्री. आर. के. गायकवाड, जिल्हाधिकारी, पुणे यांचे अध्यक्षतेखाली सभा दिनांक १८-११-२०१० (गुरुवार) रोजी सकाळी ९.३० वाजतां जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे संपन्न झाली, त्या सभेस खालील प्रमाणे सदस्य उपस्थित होते.**

| अ.क्र. | सभेस उपस्थित आंमत्रित / निमंत्रित सदस्य | सदस्य निमंत्रित / आमंत्रित |
|---|---|---|
| १ | मा. श्री. आर. के. गायकवाड,<br>जिल्हाधिकारी, पुणे | अध्यक्ष |
| २ | मा. श्री. एन.आर.गटणे,<br>प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पुणे | सदस्य |
| ३ | मा. सहाय्यक संचालक,<br>नगर रचना, पुणे यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | मा. श्री. सी. ए. निनाळे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,<br>पुणे | सदस्य |
| ५ | मा. आत्माराम अे. माळी,<br>अग्रणी जिल्हा व्यवस्थापक, बँकऑफ महाराष्ट्र, पुणे | सदस्य |
| ६ | मा. श्री.उल्हास सु. कुलकर्णी,<br>कार्यकारी अभियंता, माहिती व तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र औद्योगिक<br>विकास महामंडळ, पुणे | सदस्य |
| ७ | मा. श्री. पी. डी. पवार,<br>सरकारी कामगार अधिकारी, कामगार उप-आयुक्त यांचे कार्यालय,<br>शिवाजीनगर, पुणे. | सदस्य |
| ८ | मा. श्री. श्रीकांत जनार्दन तिखे,<br>कार्यालयीन अधिक्षक, राज्य कामगार विमा योजना, बिबवेवाडी, पुणे. | सदस्य |
| ९ | मा. श्री. पांगारे,<br>(स्थापत्य विभाग), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, चिंचवड,पुणे | सदस्य |
| १० | मा. श्री. निलेश वसंत वेर्लेकर,<br>विभागीय अग्निशामक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास<br>महामंडळ, पुणे | सदस्य |
| ११ | मा. श्री. गोपाळ श्रीराम पाटील,<br>सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या., (पुग्रावि.),<br>पुणे. | सदस्य |
| १२ | मा. श्री. सी. एस. कावरे,<br>निरिक्षक, पि.सि.एम.सी., पिंपरी, पुणे. | सदस्य |
| १३ | श्री. शिवाजी निंबाळकर,<br>संचालक, बारामती चेंबरऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, बारामती, पुणे | निमंत्रित |
| १४ | श्री. धनंजस जामदार,<br>अध्यक्ष, बारामती चेंबरऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, बारामती, पुणे | निमंत्रित |
| १५ | श्री. महादेव गायकवाड,<br>सचिव, बारामती चेंबरऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, बारामती, पुणे | निमंत्रित |
| १६ | श्री. गोविंद पी.पानसरे,<br>कार्यालयाध्यक्ष, पिंपरी-चिंचवड लघु उद्योजक विकास समिती, पुणे | निमंत्रित |
| १७ | श्री. डि.के.ठोसर,<br>व्यवस्थापक, जिल्हाउद्योग केंद्र, पुणे | सदस्य |
| १८ | मा. श्री. एस.एस.सुरवसे,<br>महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे | सदस्य सचिव |